## संक्षिप्त

### माजी सैनिक, वीर पत्नी, वीरमाता यांच्या विविध दाखल्यांसाठी उद्यापासून शिबिर

**कोल्हापूर :** जिल्ह्यात दि. १ ते दि. ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत सोमवार, दि. ५ रोजी 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा उपक्रम होणार आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीर पत्नी, वीरमाता व त्यांचे अवलंबित माजी सैनिकांनी त्यांच्या महसूल संबंधीच्या तक्रारींचा निपटारा केला जाणार आहे. तसेच महसूल विभागाकडील विविध दाखले देण्यात येणार आहेत. संबंधित तालुक्यातील तहसीलदार कार्यालयात संपर्क साधून आपल्या तक्रारींचे निराकरण करून घ्यावे तसेच आवश्यक विविध दाखले प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (निवृत्त) डॉ. भीमसेन चवदार यांनी केले आहे. या कार्यक्रमांतर्गत तालुका स्तरावर शहीद सैनिकांची वीर पत्नी, वीर माता, वीर पिता यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### गारगोटीचे ग्रामविकास अधिकारी परीट निलंबित

**गारगोटी :** गारगोटी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी राजाराम परीट यांना ग्रामस्थांच्या आरोग्य रक्षणामध्ये हलगर्जीपणा करून टीसीएल खरेदीमध्ये भ्रष्टाचार केल्याने निलंबित केल्याची माहिती उपसरपंच सागर शिंदे यांनी दिली. ग्रामस्थांच्या आरोग्याशी निगडित असणाऱ्या प्रश्नावर बहुमतातील तेरा सदस्यांच्या आघाडीच्या तक्रारीनुसार विभागीय चौकशीकरून परीट निलंबित झाले आहेत. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत परीट यांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी केली गेली. या चौकशीमध्ये परीट यांनी कर्तव्यपालनात अक्षम्य हलगर्जीपणा केल्याचे आढळून आले.



**कोल्हापूर : राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर कार्यकारिणीच्या बैठकीत बोलताना आर. के. पोवार. सोबत रामराजे कुपेकर, अनिल घाटगे, पद्मजा तिवले, सुनील देसाई, निरंजन कदम आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

# विधानसभेच्या जिल्ह्यातील पाच ते सहा जागा लढविणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभेच्या जिल्ह्यातील पाच ते सहा जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने लढविण्याचा निर्णय पक्षाच्या शहर कार्यकारिणीच्या बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. राष्ट्रवादीच्या पारंपरिक चंदगड, राधानगरी-भुदरगड व कागल या मतदारसंघांसह कोल्हापूर उत्तर किंवा कोल्हापूर दक्षिण आणि इचलकरंजी या जागांवर दावा करण्याचेही बैठकीत ठरले. अध्यक्षस्थानी शहराध्यक्ष आर. के. पोवार होते.

सरचिटणीस सुनील देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महिला शहराध्यक्ष पद्मजा तिवले, महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी माने, युवक जिल्हाध्यक्ष रोहित पाटील, रामराजे कुपेकर, निरंजन कदम, रावसाहेब भिलवडे, शिवानंद माळी यांची भाषणे झाली. बैठकीस रमेश पवार, महादेव पाटील, शीतल तिवडे, गणेश जाधव, आप्पा हजारे, मकरंद जोंधळे, मुसाभाई कुलकर्णी, नागेश फरांडे तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्याध्यक्ष अनिल घाटगे यांनी आभार मानले.

● **राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष शहर कार्यकारिणी बैठकीत निर्णय**

# संजय घोडावत कॉमर्स अ‍ॅकॅडमीचे सीए फाऊंडेशन परीक्षेत यश

**कोल्हापूर :** चार्टर्ड अकौंटंटसाठी जूनमध्ये घेण्यात आलेल्या सीए फाऊंडेशन परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत संजय घोडावत कॉमर्स अ‍ॅकॅडमीच्या एकूण १७ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून घवघवीत यश मिळवले.



युग मारू



ओम येडवडे



श्रेया मोडासे

युग मारू हा विद्यार्थी एकूण चारशेपैकी ३५९ गुण मिळवून उत्तीर्ण झाला. तसेच ओम येडवडे ३२४ आणि श्रेया मोडासे २९० गुणांसहित उत्तीर्ण झाले. १७ पैकी सहा विद्यार्थी विशेष प्राविण्यासहित उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे डायरेक्टर के. वासू, सेंटर हेड विवेक गुप्ता, प्रिन्सिपल चैताली गुगरी व झोनल हेड एम. एस. प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष संजय घोडावत व विश्वस्त विनायक भोसले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दिल्लीतील आंदोलनासाठी जिल्ह्यातील पेन्शनर रवाना

**कोल्हापूर :** विविध मागण्यांसाठी बुधवारी (दि.३१) दिल्लीतील जंतर-मंतर येथे होणाऱ्या आंदोलनासाठी ईपीएस९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे जिल्ह्यातील कार्यकर्ते रवाना झाले. जिल्हाध्यक्ष बी. एस. किल्लेदार, शहराध्यक्ष लालासाहेब गायकवाड यांच्या समवेत जिल्ह्यातील ६४ निवृत्ती वेतनधारक या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

आयुष्यातील कर्तृत्वाचा संपूर्ण काळ, खासगी सहकारी निमसरकारी क्षेत्रामध्ये नोकरीच्या रूपाने व्यतीत करून राज्याच्या व देशाच्या उन्नतीमध्ये हातभार लावलेले, देशातील ७८ लाख पेन्शनर दरमहा १००० ते २००० इतक्या अल्प पेन्शनमुळे हलाखीचे जीवन जगत आहेत. कोश्यारी समितीच्या शिफारशीनुसार वाढीव पेन्शन यासह विविध लाभ मिळावेत, याकरिता गेल्या आठ वर्षांपासून संघर्ष सुरू आहे.

# मनोज जरांगे दौरा नियोजन बैठक २ ऑगस्टला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठा आरक्षण लढ्यातील मराठा योद्धा मनोज जरांगे हे क्रांतिदिनी (दि. ९ ऑगस्ट) मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली अंतर्गत कोल्हापुरात येणार आहेत. त्यांच्या दौरा नियोजनासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने शुक्रवार, दि. २ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे नियोजन बैठकीचे आयोजन केले आहे. यावेळी सर्व शहर, तालुका समन्वयक-कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मराठा समाजातर्फे करण्यात आले आहे.

# जिल्हा बँक कर्मचाऱ्यांना चार टक्के पगार वाढ

## १९०० कर्मचाऱ्यांना लाभ : एप्रिल २०१७ पासूनचा फरकही मिळणार : बँकेवर ३६ कोटींचा बोजा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्मचाऱ्यांना चार टक्के पगारवाढ करण्याचा निर्णय संचालकांच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी पालकमंत्री व बँकेचे अध्यक्ष हसन मुश्रीफ होते. कोडीको आणि बँक एम्प्लॉईज युनियन या दोन्ही संघटना व बँक व्यवस्थापनामध्ये या पगारवाढीचा दि. ५ ऑगस्टला करार होणार आहे. दि. १ एप्रिल २०१७ पासूनचा फरकही कर्मचाऱ्यांना देण्यात येणार असल्याने बँकेवर ३६ कोटींचा बोजा पडणार आहे.



जिल्हा बँक कर्मचारी व बँक व्यवस्थापनामध्ये २००७ मध्ये पगारवाढीचा करार झाला होता. त्याची मुदत मार्च २०११ संपली. मात्र, बँकेवर २००९ ला प्रशासक आल्याने पुन्हा करारच होऊ शकला नाही. मे २०१५ मध्ये बँकेचे संचालक मंडळ कार्यरत झाले. मात्र, बँकेला संचित तोटा असल्याने पगारवाढीचा निर्णय होऊ शकला नाही. बँक २०१७ ला नफ्यात आल्यानंतर युनियनने पगारवाढीसाठी प्रयत्न सुरू केले. गेल्या वर्षभरात बँक व्यवस्थापन व युनियनमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. यातून चार टक्के पगारवाढ, सात वर्षांचा फरक आदी मागण्या मान्य करण्यात आल्या. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष आमदार राजू आवळे, आ. सतेज पाटील, आ. राजेंद्र पाटील-यड्रावकर, आ. राजेश पाटील, माजी खासदार निवेदिता माने, माजी आमदार अमल महाडिक, ए. वाय. पाटील, भैया माने, बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, कर्मचारी प्रतिनिधी आय. बी. मुन्शी, दिलीप लोखंडे आदी संचालक व प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरख शिंदे उपस्थित होते.

**संचालक मंडळाच्या बैठकीतील निर्णय**

- एक एप्रिल २०१७ पासून चार टक्के पगारवाढ
- सात वर्षांचा ३६ कोटी फरकही देणार.
- सेवानिवृत्तांना ७१ महिन्यांचे ७१०० रुपये मिळणार.

**सेवानिवृत्तांनाही महिन्याला १०० रुपये वाढ**

एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना कोणतीही पगारवाढ न मिळाल्याने युनियनच्या मागणीनुसार १०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे.

# नवीन कायद्यांचा भर न्यायावर

## जिल्हा परिषदेचे सीईओ कार्तिकेयन यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन कायद्यांचा भर शिक्षेपेक्षा न्यायावर अधिक असल्याचे उद्‌गार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी काढले.

केंद्रीय संचार ब्युरो आणि जिल्हा परिषदेच्या वतीने तीन दिवस भरविण्यात आलेल्या नव्या भारताचे नवीन कायदे या नवीन फौजदारी कायद्यांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन कार्तिकेयन यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

नवीन फौजदारी कायद्याने जुन्या कायद्यांमध्ये असलेल्या छोट्या गुन्ह्यांसाठीच्या जाचक शिक्षा कमी केल्या असून, त्यांना अधिक नागरिक स्नेही बनवले असल्याचेही कार्तिकेयन म्हणाले. गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी आणि नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी या कायद्यांचा वापर होईल, असे सहायक सरकारी वकील समीउल्ला पाटील यांनी सांगितले.



**कोल्हापूर : जिल्हा परिषदेमध्ये भरविण्यात आलेल्या नव्या भारताचे नवीन कायदे माहिती प्रदर्शनाचे उद्‌घाटन कार्तिकेयन एस. यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेतील अधिकारी उपस्थित होते.**

जिल्हा परिषदेत दि. १ ऑगस्टपर्यंत भरविण्यात आलेल्या या चित्र प्रदर्शनात नवीन फौजदारी कायद्यांची माहिती मांडण्यात आली आहे.

कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजयकुमार माने, प्रकल्प संचालक सुषमा देसाई, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा देसाई, अरुण जाधव, वित्त अधिकारी अतुल आकुर्डे, प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर, केंद्रीय संचार ब्युरोचे अधिकारी महेश चोपडे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीतर्फे आज आंदोलन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उरूण येथे महिलेवर अत्याचार करून तिची करण्यात आलेल्या हत्येच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने बुधवारी (दि.३१) सकाळी साडेअकरा वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत.

तसेच चित्रा वाघ यांनी शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेचा निषेधही यावेळी करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाच्या महिला शहराध्यक्ष पद्मजा तिवले यांनी केले आहे.



**पाटगाव : येथील मौनीसागर जलाशय पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर धरणाच्या सांडव्यातून वाहणारे पाणी.**

# पाटगावमधील 'मौनीसागर' जलाशय १०० टक्के भरला

**कडगाव : पुढारी वृत्तसेवा**

पाटगाव परिसरात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे पाटगाव येथील मध्यमप्रकल्प मौनी सागर जलाशय पूर्ण क्षमतेने भरून, सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग चालू झाला आहे. धरणातून पॉवर हाऊससाठी २०० क्युसेक पाणी सोडले जात असून, पावसाचा जोर वाढल्यास सांडव्यातून विसर्ग वाढण्याची शक्यता आहे.

पाटगाव धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने प्रशासनाच्या वतीने भुदरगड तालुक्यातील नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर सांडव्यातून पडणारे पाणी कमी प्रमाणात असल्याची माहिती शाखा अभियंता मनोज देसाई यांनी दिली.

गत वर्षीच्या तुलनेत यंदा धरण दोन महिने अगोदर भरले आहे. गतवर्षी हे धरण २५ सप्टेंबरला भरले होते. यावर्षी हे धरण ३० जुलै रोजी सायंकाळी ६.१५ ला भरले आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. धरणात सुमारे ३.७५ टी.एम.सी. पाणीसाठा झाला आहे. धरण भरल्याने तहसीलदार अर्चना पाटील यांनी आपत्कालीन प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.


**अकलूज नगरपरिषद अकलूज**
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
फोन-(०२१८५) २२२०३५, २२२५९२, स्थापना दिनांक ०३/०८/२०२१
Email-comcakluj21@gmail.com

जा. क्र./६७६/अनप/बांधकाम/२०२४ दि. ३०/०७/२०२४

**अकलूज नगरपरिषद, अकलूज**
सन २०२४-२०२५
**(दुसरी वेळ)**

अकलूज नगरपरिषेदे नगरोत्थान महाभियान अंतर्गत अकलूज शहर भुयारी गटार योजना या कामासाठी योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम ९८.०८ कोटी असून कोऱ्या ई-निविदा नमुना https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ३१/०७/२०२४ ते १४/०८/२०२४ या कालावधीमध्ये उपलब्ध राहिल. सदर कामाची ई-निविदा कंत्राटदाराने https://mahatenders.gov.in या संकतस्थळावर दिनांक १४/०८/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

**सही/- (दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद, अकलूज**

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**ADVERTISEMENT NO.06/2024**

Applications are invited in the prescribed form available online on Shivaji University website for the following administrative post to be filled in 'SUK Research and Development Foundation (SUKRDF)' a Section 8 Company of Shivaji University, Kolhapur. This post is purely on contract basis and will be offered for a period of 11 months.

| Post Coad | Post Name | Vacant Post |
|---|---|---|
| CEO | Chief Executive Officer | 1 |

The details of Qualification, Age, Pay and Emoluments, prescribed. Online Application Form and the instructions therein, etc. are available on the University website **www.unishivaji.ac.in** under the tab **"Recruitment".**

- **Interested candidates may apply on or before 07/08/2024.**
- **Walk-In-Interview on 09-08-2024 at 12:00 Noon onwards** in the Administrative Building. Reporting Time 10:00 a.m. to 11:00 a.m.

**Kolhapur.**
**Date: 31/07/2024**
**Sd/-**
**Dr. V. N. Shinde**
**Registrar**

जा.क्र./०९६८/सन २०२४-२५ दिनांक :३०/०७/२०२४

**खेड नगरपरिषद, खेड**
**फेर ई-निविदा सुचना (दुसरी मागणी)**

१) खेड नगरपरिषद मंजूर नगर रचना योजना मधील अंतीम भूखंड क्र.१३५-(प्ले ग्राऊंड) आरक्षण विकसित करणे व सुशोभिकरण करणे. २) मंजूर नगर रचना योजनामधील अंतीम भूखंड क्र. १५६-प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान विकसित करणे या कामांची फेर ई निविदा सुचना (दुसरी मागणी) शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३१/०७/२०२४ रोजीने ऑनलाईन प्रसिद्ध करणेत येत आहे. या बाबतची सविस्तर सुचना व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती वरील नमुद केलेल्या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही/-**
**मुख्याधिकारी, खेड नगरपरिषद**

**सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**
सार्व. बांधकाम विभाग मुख्यालय
**जाहीर प्रकटन क्रमांक. ०१/२०२४-२५**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यालयामार्फत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यालयामार्फत **सां.मि.कु. मनपा / शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभागाची नोंदणी असलेल्या खुल्या प्रवर्गातील मक्तेदार** यांचेकडून निविदेमधील नमुद कामांसाठी ई-निविदा पध्दतीनुसार www.mahatenders.gov.in या वेबसाईट द्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाबाबतची सविस्तर माहिती निविदा फॉर्म फी कामाची मुदत शासन निर्णयाप्रमाणे दर निविदा विक्री व स्विकारणे तसेच निविदा उघडणे व अन्य वेळापत्रक निविदानिहाय माहिती www.mahatenders.gov.in संकेत स्थळावर सविस्तर देणेत आलेली आहे.

१) संपुर्ण निविदा प्रक्रिया अर्ज विक्री सादरीकरण व स्विकृती E-Tender System द्वारे कार्यरत राहील.
२) निविदा ऑनलाईन प्रसिध्दी - दि. २/८/२०२४

Sd/- **आयुक्त**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या. कोल्हापूर**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दूरध्वनी क्रमांकः ९८२२८८५६६६ ई-मेल: kcnmahamandal@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र ०१ सन २०२४-२५**

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर येथील खालील कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | कोल्हापूर चित्रनगरी परिसरामध्ये घाट, जलकुंभ, गजिबो, कैफेटेरिया, गोडाऊन, शौचालय बांधणे व वृक्षारोपण तसेच बगीचा तयार करणे |
| २ | कोल्हापूर चित्रनगरीत अस्तित्वातील रस्त्याचे अंतिम डांबरीकरण करणे, रेल्वे स्थानक व वस्तीगृहाकरिता पोहच रस्ते करणे आणि संरक्षण कठडे, सांकेतिक खुणा, रोड मार्किंग तयार करणे |
| निविदा शुल्क | रु. २३६०/- वस्तू व सेवा करासहित (रूपये दोन हजार तीनशे साठ फक्त) अ.क्र. १ व २ साठी. |

अर्ज करण्यासाठी कृपया **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर **दि. ३१.०७.२०२४ ते दि. ०७.०८.२०२४ सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत** निविदा प्रपत्र उपलब्ध आहे. **दि. ०९.०८.२०२४ रोजी दुपारी १२.०० वा.** निविदा उघडण्यात येईल, अतिरिक्त माहितीसाठी मोबाईल क्र. ९८२२८८५६६६ यावर संपर्क साधावा

स्वाक्षरी/-
**व्यवस्थापकीय संचालक,**
**कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ,**
**कोल्हापूर**

**Walk-In Interview**
**Government College of Engineering, Kolhapur**

Applications are invited for Appointment as a Visiting Lecturer will be purely on Clock Hour Basis (CHB) in Mechanical & Automation, Computer Science & Engineering, Artificial Intelligence and Data Science, Electronics & Telecommunication Engineering, Electrical Engineering, Civil Engineering, Applied Mechanics, Physics, Mathematics, English, Chemistry, Yoga & Meditetion and Hindustani Music. CHB rates as per GR No. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.(१००/१६)/तांशि-१ दि. १७ एप्रिल २०२३ are Rs.900/- Per Lect. and Rs.450/- Per Pract.
Qualification as Per AICTE / UGC/ DTE Norms.
**Date & Time : 02/08/2024 at 10.30.am**
**Venue : Government Engineering College, Old Pune-Banglore Road, Vidyanagar, Kolhapur**

**Principal,**
**Government College of Engineering, Kolhapur**

डीजीआयपीआर/२०२४/२०२५/१३६६

GOVERNMENT OF MAHARASHTRA
**Govt. College of Pharmacy, Karad**
Vidyanagar, Tal – Karad , Dist – Satara Pin Code – 415 124
(NAAC 'A+' Grade Accredited by NAAC (2022) with CGPA 3.45)
(ISO 9001:2015 Certification award in 2018)
(Approved by A.I.C.T.E . New Delhi, PCI New Delhi, D.T.E. (M.S.) & Affiliated to M.S.B.T.E. Mumbai, Shivaji University, Kolhapur.) DTE Code - 6008
Estd : 1964
Website - www.gcopk.ac.in
Ph.No. & Fax No. (02164) 271196
E-Mail - gcopk05@rediffmail.com & principal.gcopkarad@dtemaharashtra.gov.in

Ref.No.: GCOPK/Estt/2024/2308 Date : 25 July 2024

**WALK IN INTERVIEW**
**(Faculty on Clock-Hour Basis)**

Candidates who are possessing required qualification as per PCI norms and desires to teach subjects of B.Pharm/M.Pharm programs and allied subjects (Computer science, Environmental science and Mathematics) only on Clock Hour Basis (CHB) for Academic year 2024-25 may attend walk-in-interview along with all testimonials (Biodata + One passport size photograph + True copy of all required documents) on **03rd August 2024, Saturday at 10.00 am** in the office of the Principal.

If B.Pharm/M.Pharm qualified candidates are not available, then candidates having M.Sc.qualification (Organic chemistry, Biochemistry, Analytical chemistry, Mathematics etc.) may also be considered.

SEAL

**(Dr.Rita D. Chakole)**
I/C Principal
Govt. College of Pharmacy, Karad.

**सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई**
१०१, मानवदृष्टी, पहिला मजला, कुर्ला कोर्टासमोर, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०.
(नोंदणी क्र. : बी.ओ.एम./आर.एस.आर./७२५ सन १९७५)

**४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे माननीय अध्यक्ष श्री. पाटील चंद्रकांत बाजीराव यांच्या अध्यक्षतेखाली पुढील कामकाजासाठी रविवार दिनांक १८/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक ०९.३० वा. **राष्ट्रीय मिल मजदूर संघ मुंबई, मजदूर मंझील, ग. द. आंबेकर मार्ग, परेल, मुंबई - ४०००१२.** येथील सभागृहात बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि. ०३/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२४ अखेरचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासणी अहवाल वाचून संचालक मंडळाच्या अहवाल साली झालेल्या सभा संमत करणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२३-२०२४ सालचा वैधानिक लेखापरिक्षण तपासणी अहवाल वाचून त्याची नोंद घेणे.
५) सन २०२४-२०२५ सालाकरीता अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
६) मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास व सन २०२४-२०२५ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
८) मागील वर्षाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
१०) संस्थेच्या निधी नियमावलीस मान्यता देणे.
११) संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या नियोजनाबाबत.
१२) संस्थेच्या शाखांना जागा खरेदी करणेबाबत.
१३) संस्थेच्या मालकीच्या शाखांची कार्यालये दुरुस्ती/नुतनीकरणाबाबत.
१४) महाबळेश्वर येथील संस्थेच्या मालकीच्या जागेवर (प्रशिक्षण केंद्रास) इमारत उभारण्याबाबत.
१५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : २०/०७/२०२४
स्थळ : मुंबई

आपला नम्र
**किशोर मुरलीधर पाटील**
**(मानद् सचिव )**
सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रे. सो. लि. मुंबई

**विशेष सूचना**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच ठिकाणी वरील कामाचा विचार करण्यासाठी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल. सदर सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) संस्थेच्या कोणत्याही सभासदास काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी अशा सूचना संस्थेच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत दि. १०/०८/२०२४ पर्यंत लेखी द्याव्यात. ऐनवेळी येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक राहणार नाही.
३) सभासदांसाठी संस्थेच्या ४९ व्या वार्षिक अहवालाची प्रत संस्थेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे तसेच संस्थेचे नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, सभेची नोटीस व अहवाल याची पीडीएफ पाहण्यासाठी www.secondarysociety.com (https://secondarysociety.com/annual_report.html) **किंवा** https://drive.google.com/file/d/142yBAw205i_v9VRw49E0aLGC7EmTaKp_/view?usp=sharing या लिंकचा वापर करावा.
४) संस्थेचे व्यवहार कोअर बँकींग प्रणालीमध्ये असल्याने मॅसेज देणेसाठी आपला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी शाखा कार्यालयात द्यावा तसेच ज्या सभासदांचे पत्ते किंवा नावे बदललेली असतील किंवा वारसाची नोंद केली नसेल त्याची नोंद कार्यालयीन दप्तरी करुन घ्यावी.

**मार्गो फायनान्स लिमिटेड**
**सीआयएन :** L65910MH1991PLC080534
**नोंदणीकृत कार्यालय :** ऑफीस क्र.३, प्लॉट क्र.२०६, गाव आळते, कुंभोज रोड, तालुका हातकणंगले, जि. कोल्हापूर -४१६ १०९, महाराष्ट्र
**दूरध्वनी :** ०११-२५७५३३३१, ४१५३९४४४, २५७६७३३०
**ईमेल :** info@margofinance.com **वेबसाईट :** www.margofinance.com

**व्हीसीद्वारे ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, ई-मतदान माहिती, बुक क्लोजरची सूचना**

सूचना देण्यात येते की मार्गो फायनान्स लिमिटेड (कंपनी)च्या सदस्यांची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम)कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या सर्क्युलर क्र. ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ ला अनुसरून **बुधवार, २१ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ)** समान ठिकाणी सदस्यांनी प्रत्यक्ष उपस्थित न राहता **व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) द्वारे** होणार असून त्यात एजीएमच्या सूचनेत नमूद केलेला व्यवहार होणार असून ती कंपनीच्या सदस्यांना ईमेल करण्यात येईल.

३३वी एजीएमबाबतची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत ज्या सदस्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेसेस कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स यांच्याकडे शुक्रवार, २६ जुलै, २०२४ रोजीप्रमाणे नोंदणीकृत आहेत, त्यांना पाठवण्याचे काम २९ जुलै, २०२४ रोजी पूर्ण झाले आहे. सूचना आणि वार्षिक अहवाल हे कंपनीची वेबसाईट www.margofinance.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वरसुद्धा उपलब्ध आहेत.

सूचनेत नमूद करण्यात आलेल्या व्यवहारावर दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारे सदस्य त्यांचे मत (मते) देऊ शकतात. कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") यांची सेवा भागधारकांना ई-मतदान सुविधा पुरवण्यासाठी घेतली आहे. **दूरस्थ ई-मतदान रविवार, १८ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) सुरू होईल आणि मंगळवार, २० ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ५.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) संपेल आणि त्यानंतर** दूरस्थ ई-मतदान मोड्यूल एनएसडीएलकडून बंद करण्यात येईल. एकदा भागधारकाने दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केल्यानंतर, भागधारकाला नंतर त्यात बदल करण्याची परवानगी नाही. तसेच, कंपनीने एजीएममध्ये दूरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठीचे पात्रता निकष निश्चित करण्याची "अंतिम दिनांक" **शुक्रवार, १६ ऑगस्ट, २०२४** निश्चित केला आहे. ज्या व्यक्तीचे नाव अंतिम दिनांक रोजी म्हणजे शुक्रवार, १६ ऑगस्ट, २०२४ रोजी डिपॉझिटरींकडे असलेल्या रजिस्टर ऑफ मेंबर्स किंवा रजिस्टर ऑफ बेनिफिशियल ओनर्समध्ये समाविष्ट असेल, त्यालाच ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. अंतिम दिनांक रोजी म्हणजे **शुक्रवार, १६ ऑगस्ट, २०२४** रोजी कंपनीच्या पेड अप इक्विटी शेअर कॅपिटलमध्ये असलेल्या शेअर्सच्या प्रमाणात सदस्यांचे मतदान अधिकार असतील. ई-मतदानाविषयीच्या सूचना एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आल्या आहेत. सदस्यांनी एजीएममधील सूचनेतील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात अशी विनंती आहे. एजीएममध्ये ई-मतदानाची प्रक्रिया ही दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेप्रमाणेच आहे. जे भागधारक एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित असतील आणि ज्यांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आणि अन्यथा मतदान करण्यास ज्यांना मनाई करण्यात आलेली नाही, ते भागधारक एजीएममध्ये ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. ज्या भागधारकांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केले आहे ते एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि त्यांची उपस्थिती गणसंख्येसाठी मोजली जाईल, तथापि, अशा भागधारकांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**ईमेल आयडी आणि केवायसी तपशील नोंदणी करण्याचे सदस्यांना आवाहन**

ज्या भागधारकांनी अद्याप त्यांचे ई-मेल आयडी नोंदणी केले नसतील त्यांनी त्यांचे ईमेल आयडी खालीलप्रमाणे घ्यावेत :

१. **प्रत्यक्ष प्रणालीमध्ये ज्यांनी शेअर्स घेतले आहेत असे भागधारक :** अशा भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे ईमेल आयडी कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटकडे नोंदवावेत, म्हणजे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (लिंक इनटाईम) कडे कंपनीच्या आरटीए यांना delhi@linkintime.co.in वर विनंती करून नोंद करावेत. सदर विनंतीसह केवायसी अद्ययावतीकरणासाठी फॉर्म आयएसआर-१ जोडावा
२. **डीमटेरियलाईज्ड प्रणालीमध्ये ज्यांचे शेअर्स आहेत असे भागधारक :** अशा भागधारकांनी त्यांचे ईमेल आयडी हे संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांच्याकडे नोंदणी करावी.
ईमेल पत्ते नोंद करताना काही शंका/अडचणी आल्यास, भागधारकांनी लिंक इनटाईमला delhi@linkintime.co.in वर किंवा कंपनीला info@margofinance.com वर लिहावे.

**बुक क्लोजर :**
कंपनीचे रजिस्टर ऑफ मेंबर्स आणि शेअर ट्रान्सफर बुक्स बुधवार, १४ ऑगस्ट,२०२४ पासून बुधवार, २१ ऑगस्ट २०२४ (दोन्ही दिवसांसहित) ३३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी बंद राहतील.

दिनांक : ३१ जुलै,२०२४
ठिकाण : मुंबई

**संचालक मंडळाच्या आदेशाने**
**मार्गो फायनान्स लिमिटेडसाठी**
**स्वाक्षरी/-**
**कृष्णा मकवाना**
**कंपनी सेक्रेटरी**